# अभ्यास

## नावे सांगा आणि चित्रे काढा

१. बुद्धपौर्णिमा, दसरा (विजयादशमी), बकरीईद, गुरुनानक जयंती, दिवाळी, या सणांच्या दिवशी चंद्राचा आकार कसा असेल ते चित्रं काढून दाखवा.

## काय सारखे? काय वेगळे?

१. खाली दिलेल्या गोष्टींमधील दोन सारखे व दोन फरकाचे मुद्दे सांगा

अ. सूर्य आणि चंद्र

ब. एक काडी आणि तिची सावली

क. उगवतानाचा चंद्र आणि आकाशात खूप वर आलेला चंद्र

ड. सूर्योदय आणि सूर्यास्त

## सांगा आणि लिहा

१. चंद्र, सूर्य आणि तारे यांच्यावरच्या काही कविता किंवा गाणी आठवा आणि म्हणा. तुम्ही स्वत: काही नवीन गाणी, कविता तयार करा.

## विचारा आणि शोधून काढा

१. **नावे सांगा आणि चित्रे काढा** मध्ये तुम्ही चंद्राचे निरनिराळ्या सणांच्या दिवशी दिसणारे आकार काढलेत. चंद्राच्या विशिष्ट आकाराच्या दिवशी साजऱ्या होणाऱ्या अजून काही खास दिवसांची माहिती जमवा.

२. नक्षत्रांबद्दलच्या काही गोष्टी जमवा.

## शोधा म्हणजे सापडेल!

१. डावीकडील घटना आणि उजवीकडील ऋतू यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| मोठा दिवस, लहान रात्र | |
| लहान दिवस, मोठी रात्र | हिवाळा |
| सूर्य लवकर उगवतो | |
| सूर्य उशिरा उगवतो | |
| सूर्य लवकर मावळतो | उन्हाळा |
| सूर्य उशिरा मावळतो | |

२. डावीकडील घटना आणि उजवीकडील वेळा यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| पौर्णिमेचा चंद्र उगवतो | सूर्योदयाच्या वेळेला |
| पौर्णिमेचा चंद्र मावळतो | |
| चंद्रकोर उगवते | सूर्यास्ताच्या वेळेला |
| चंद्रकोर मावळते | |

## शब्द शिका

वाहणे तरंगणे बुडणे मिसळणे विरघळणे गाळणे गढूळ नितळ

पाणी हे **द्रव** आहे. वाहणाऱ्या पदार्थांना द्रव पदार्थ म्हणतात.

द्रवरूपाचे वाफेत रूपांतर होण्याच्या क्रियेला **बाष्पीभवन** म्हणतात.

पाणी गरम केल्यावर त्याचे **बाष्पीभवन** लवकर होते.

पाण्याची वाफ म्हणजे एक **वायू** आहे. हवेतील इतर वायूंमध्ये ती मिसळते.

पाण्याची वाफ थंड केल्यावर तिचे **द्रव** रूप पाणी बनते.

वाफेचे द्रवात रूपांतर होण्याच्या क्रियेला **संघनन** असे म्हणतात.

पाणी अतिशय थंड केले की त्याचे बर्फ बनते. बर्फ हा **घन पदार्थ** आहे. घन पदार्थ वाहत नाहीत.

## अभ्यास

### नावे सांगा आणि चित्रे काढा.

१. वाहते पाणी

२. वाहत नसलेले पाणी

३. कृतीपुस्तकामधील बाटल्यांमध्ये पाण्याची पातळी दाखवा. (पान ८६)

### प्रश्न तुमच्या आवडीचे!

१. पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहणाऱ्या काही गोष्टी तुम्ही पाहिल्या असतील. त्यांची नावे सांगा.

२. पाण्याबरोबर तुम्ही कुठले खेळ खेळता?

३. पाण्यावर तरंगणाऱ्या तीन वस्तूंची आणि पाण्यामध्ये बुडणाऱ्या तीन वस्तूंची नावे लिहा.

४. पाण्यात विरघळणाऱ्या घन, द्रव आणि वायूरूप पदार्थांची नावे लिहा.

५. पाण्यात **न** विरघणाऱ्या घन आणि द्रव पदार्थांची नावे लिहा.

६. तुम्ही पाणी उकळण्यासाठी चुलीवर ठेवले. थोडा वेळ उकळल्यावर पाणी कमी दिसते. हे पाणी कुठे जाते?

७. तुम्ही धुकं कुठे पाहिलं आहे? ते कशाचं बनलं होतं?

८. ओले कपडे सुकतात तेव्हा त्यातलं पाणी कुठे जातं?

## सर्व सजीवांना जगण्यासाठी पाण्याची गरज आहे.

सर्व सजीवांच्या शरीरात पाणी असते. त्यांना जगण्यासाठी आणि वाढीसाठी पाण्याची गरज असते. आपली त्वचा, स्नायू, रक्त, हाडं आणि दातांमध्येसुद्धा पाणी असते.

## शब्द शिका

जलवनस्पती

तंतू

जलचर प्राणी

पाणथळ जागा

दलदल

## अभ्यास

### नावे सांगा आणि चित्रे काढा

१. रसदार फळे आणि भाज्या

२. एक वनस्पती जिला

अ. पाणी अजिबात घातले नाही

आ. पुरेसे पाणी घातले आहे

इ. गरजेपेक्षा जास्त पाणी घातले आहे

### प्रश्न तुमच्या आवडीचे!

१. वनस्पतीभोवती मातीत तुम्ही पाणी घातले. हे पाणी वनस्पतीच्या सर्व भागांपर्यंत पोहोचते का? कसे?

२. काही पाणी वनस्पतीतून बाहेर पडते का? हे तुम्हाला कसे समजले?

३. पुढीलपैकी वनस्पतीच्या कुठल्या भागामध्ये पाणी असते? तुम्हाला तसे का वाटते?

मूळ खोड देठ फांदी पान फूल फळ बी

४. पुढीलपैकी कुठल्या वस्तूंमध्ये पाणी असते? तुम्हाला तसे का वाटते?

संत्र्याचा रस केळं शेंगदाणा पोळी तुमचे शरीर

# अभ्यास

## नावे लिहा आणि चित्रे काढा.

१. बी पेरल्यानंतर प्रत्येक आठवड्यात तुमचं शेत किंवा रोपं कशी दिसतात ते चित्रं काढून दाखवा.

२. तुमच्या भागात वापरण्यात येणाऱ्या शेतीच्या किंवा बागकामाच्या अवजारांचं चित्रं काढा.

## प्रश्न तुमच्या आवडीचे!

१. कुठल्याही वनस्पतींपासून आणि प्राण्यापासूनही मिळत नाही अशा तुमच्या रोजच्या जेवणातील एखाद्या अन्नसामग्रीचे नाव सांगा.

२. योग्य क्रम लावा.
झोडपणी नांगरणी कापणी पेरणी भरडणे पाणीपुरवठा

३. योग्य क्रम लावा
भेंडीची फुलं भेंडीची भाजी रोपावरील कच्ची भेंडी
चिरलेली भेंडी रोपावरील तयार भेंडी अंकुरणारी भेंडीची बी

४. हे अन्नपदार्थ आपल्याला कुठल्या वनस्पतीपासून आणि त्या वनस्पतीच्या कुठल्या भागापासून मिळतात ते लिहा.
मका खोबरेल तेल साखर मटार गाजर कोबी फुलकोबी

५. माणसं खातात अशा पाळीव आणि जंगली प्राण्यांची नावे लिहा.

६. माणसं खातात अशा काही पाण्यातल्या वनस्पती आणि प्राण्यांची नावे लिहा.

७. विशेष सणासुदीच्या दिवशीच आपण खातो अशा काही पदार्थांची आणि त्या सणांची नावे लिहा.

## वर्गातील चर्चा

१. तुमच्या सभोवतालच्या सगळ्यांना पुरेसं अन्न मिळतं का? काही लोकांना पुरेसं जेवण का मिळत नाही? पुरेसं अन्न मिळावं म्हणून त्यांना काय करता येईल?

२. काही माणसं कधीकधी गरजेपेक्षा जास्त खातात, चुकीचा आहार घेतात असं तुम्हाला वाटतं का? उदाहरणे सांगा. असं का होत असेल? तुम्हाला काय वाटतं ते सांगा.

३. नांगरणी करताना ट्रॅक्टर किंवा प्राणी वापरतात. या दोन्हीचे फायदे कुठले असतील? आणि तोटे कुठले असतील?

## काय सारखे? काय वेगळे?

१. फळं आणि भाज्या यांच्यामध्ये काय फरक आहे? एखाद्या फळाची भाजी करता येईल का? उदाहरण द्या.

